## संपादकीय

### चिटफंड व्यवसायाने पुन्हा सर्वसामान्यांवर कुऱ्हाड

सीमेलगत असलेल्या मध्यप्रदेश राज्यातील लांजी तालुक्यात चालत असलेल्या चिटफंड व्यवसायात मध्यप्रदेशसह महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्यातील हजारो लोकांनी तीन महिन्यात दामदुप्पट करून देणाऱ्या चिटफंड व्यवसायात कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली.परंतु शेवटी या व्यवसायावर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई करत चिटफंड व्यवसाय बंद पाडला आणि रोख रकमेसह सर्व दस्तावेज ताब्यात घेतल्यामुळे गुंतवणूक करणाऱ्या लोकांना जबरदस्त शॉक लागला आहे. त्यांचे, तेलही गेले आणि तूपही गेले, अशी परिस्थिती झाली आहे. विशेष म्हणजे गेल्या पाच सहा वर्षापासून हा चिटफंडचा कारोबार सुरु असताना पोलिस प्रशासनाला कसे कळले नाही हा जेवढा महत्वाचा प्रश्न आज उपस्थित झालेला आहे. तेवढाच सदर चिटफंड कंपनीतील लोकं हे जे बँकांना शक्य नाही ते कसे करायचे हा सुध्दा अर्थतज्ञांसमोर एक आवाहन ठरले आहे. सर्वसामान्य हजारो कुटुबांनी लावलेल्या पैसाचे काय असे अनेक प्रश्न निर्माण झाले असून चिटफंड कंपन्यामुळे आधीही फसवणुक झालेली असतानाही नागरिक मात्र त्यांना बळी पडतातच कसे.

लांजी येथे अंबानी म्हणून प्रसिद्ध झालेले चिटफंड व्यवसायाचे मुख्य सूत्रधार सोमेंद्र कंकरायणेला मध्यप्रदेश पोलिसांनी अटक केली असून चिटफंड व्यवसाय चालवणाऱ्या इतर सहकाऱ्यांना सुद्धा आपल्या ताब्यात घेतले. त्यांच्या कडून दोनशे कोटींची रोकड व नोटा मोजण्याचे मशीन, शेकडो धनादेश पुस्तिका आणि इतर दस्तावेज जप्त करताच गुतंवणूक करणारे समर्थक त्यांच्या समर्थनात रस्त्यावर उतरून आंदोलन करु लागल्याने चिटफंड व्यवसाय चालविणाऱ्यांना तथाकथीत राजकीय नेत्याचे स्वरुप देण्याचाही प्रयत्न झाल्याचे दिसून येत असला तरी सध्याच्या घडीला चिटफंडाचा व्यवसाय बंद केला आहे. अशात आता ज्या लोकांनी आपल्या घामाची कमाई तिथे गुंतवली, ती परत मिळणार नाही असे वाटत असताना, “भाऊ तुम्ही किती पैसे टाकले होते’ असा प्रश्न एकमेकांना विचारतांना दिसून येत आहेत. सध्या गोंदिया जिल्ह्यात या चिटफंड व्यवसायाचीच चर्चा रंगलेली दिसत आहे. विशेष म्हणजे गोंदियातील एका भंगारव्यवसायिकासह, नगरपरिषदेच्या काही माजी नगरसेवकांनीही यात आपली गुतंवणूक केली होती. तर काही धानव्यवसायकियांनी यातूनच पैसा कमावून धानसंस्था सिमावर्ती भागात सुरु केल्याचेही बोलले जात आहे.

मध्यप्रदेशातील लांजी तालुक्यातील बोलेगाव येथील युवक सोमेंद्र कंकरायणे हा विदेशातून व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण करून मायदेशी परतला आणि त्यांनी तीन महिन्यात दामदुप्पट देण्याचा चिटफंड व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला काही गावांपर्यंत मर्यादित असलेला हा व्यवसाय हळूहळू संपूर्ण बालाघाट जिल्ह्यात आणि त्यानंतर महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यात सुद्धा पोहोचला. व्यवसायाची व्याप्ती वाढल्यानंतर आपले एजंट नियुक्त केले आणि व्यवसायाचे जाळे पसरवले. लांजी तालुका आमगाव व सालेकसा तालुक्याला लागून असल्याने बाजारहाटासह विविध सामाजिक कार्यक्रमाच्या निमित्ताने लोकांचे नेहमी येणे-जाणे सुरू असते. त्यामुळे येथील लोकांच्या आणि नातेवाईकांच्या माध्यमातून हा व्यवसाय गोंदिया जिल्ह्यात सुद्धा पसरला.

जिल्ह्यातील हजारो लोकांनी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक या चिटफंडमध्ये केली.जेव्हा एकाने ५० हजार टाकले, तर त्याला अवघ्या तीन महिन्यांतच एक लाख रुपये मिळाले. एक लाख रुपये टाकले, तर दोन लाख मिळाले. स्वप्न वाटत असताना लोकांना जेव्हा दुप्पट रक्कम मिळू लागली, तेव्हा इतरांच्या मनात सुद्धा लालसा बळावली आणि कुणी एक, तर कुणी दोन लाख व त्यापेक्षा जास्त अशी गुंतवणूक करू लागले. शेतीत फायदा होत नसल्याने या व्यवसायात गुंतवणूक करणे उत्तम राहील असे वाटून, मागील काही दिवसात लांजी आणि सालेकसा तालुक्यात अनेक शेतकरी आपली शेतजमीन विकायला निघाले. परंतु शेती खरेदी करणारा कोणी मिळत नसताना चिटफंड व्यवसायिकांच्या एजंटाने त्यांची शेती खरेदी केल्याचे प्रकार घडल्याचे समोर येऊ लागले.

अनेकांनी आपल्या घरातील दागिने विकून पैसे गुंतवले. सराफा व्यवसायी जुने दागिने खरेदी करताना थकले. शेवटी त्यांनीही दागिने खरेदी बंद केली. अशात ही बाब बालाघाट जिल्ह्यातील राजकारणी लोकांच्या नजरेत खटकली आणि जिल्हा प्रशासन सुद्धा यावर नजर ठेवून बसला. त्यातच लांजीच्या आमदार हिना कावरे यांनी मध्य प्रदेश विधानसभेत चिटफंड व्यवसायाचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर काही दिवसात एका भाजप आमदाराने हा मुद्दा विधानसभेत मांडला, तेव्हा शासनाने चिटफंड व्यवसायाचा तपास करण्याचे आदेश दिले आणि या चिटफंड घोटाळ्यातील आरोपीच्या शोधात निघालेल्या पोलिसांना तपासादरम्यान मात्र चक्रावून सोडणारे कागदपत्र मिळाल्याने एका छोट्याश्या तालुक्यात सुरु झालेल्या या चिटफंड व्यवसायाकडे पोलिसांच्या गुप्तयंत्रणेचे दुर्लक्ष कसे राहिले असेही प्रश्न या माध्यमातून निर्माण झाले आहेत. आज जरी या चिटफंड व्यवसायातील लोकांना पकडण्यात आले असले तरी त्यांच्यासाठी ५० किलोमिटरची बाईकरॅली काढून आंदोलन करणारे युवक हे भविष्यात मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्याच्या राजकारणाला कलाटणी देणारेही ठरू शकतात की काय असे चित्र या चिटफंड व्यवसायाचा उघडकीसीनंतर समोर आले आहे.

# मुस्लिम जगताचे भारुड;आणि हिन्दू राष्ट्र!

जगातले ५७ देश इस्लामिक असताना भारताला हिन्दू राष्ट्र का करु नये असा आग्रही तर्क संघवर्तुळातून मांडल्या जातो. उठताबसता मुस्लिमांचे उदाहरण पूढे करून हिन्दुना चेतविण्याचा हा प्रकार असतो. कसेही करून हिन्दूमन हे कायम पावित्र्यात असावे याची ही सततची मनभरणी असते. यात, क्वचितच कुणी ही ५७ इस्लामिक राष्ट्रे कोणती हे विचारले असेल.

खरेतर , जगातील एकूण १९५ देशात (राष्ट्रात) , सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्येचे राष्ट्र म्हणजे शेजारचे पाकिस्तान आहे. या पाकिस्तानची लोकसंख्या किती? केवळ २२ कोटी. आपली मात्र, १३८ कोटी आहे. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाची मुस्लिम जनसंख्या कुठे? तर ती भारतात आहे. १८ कोटी मुस्लिम इथे आहेत. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर बांगलादेश (१७ कोटी) आहे. उरलेले लाखांचे मुस्लिम देश बरेच आहेत. ते सर्वच प्रभावी असे म्हणता येत नाहीत.

संपूर्ण जगाची जनसंख्या अदमासे ७५० कोटी असावी. या जनसंख्येत , संख्येनुसार पहिल्या दहाची क्रमवारी लावायची झाल्यास ती पूढीलप्रमाणे आहे. कंसात आकडे कोटीत आहेत. चीन (१४४), भारत (१३८), अमेरिका (३३), इंडोनेशिया (२७), पाकिस्तान (२२), ब्राझील (२१), नायजेरिया (२०), बांगलादेश (१७), रशिया (१५) व मेक्सिको (१३) अशी आहे. पैकी साधारणतः २८० कोटी लोक भारत व चीन याच दोन देशात असतात. राहीला मुद्दा मुस्लिम जगताचा तर तेल उत्पादक, कमी जनसंख्येचे आखाती देश बरेच आहेत. जगात म्हणाल तर, तालुका आकाराचेही बरेच देश आहेत.

या अशा स्थितीत हिंदू राष्ट्राचा आग्रह कां? आणि कोण करतय? शिवाय हे मागणे सत्त्तेशी संबंधित आहे. त्यात संसद संलग्न आहे. किमान हिंदुंनी तरी समजून घ्यायला हवय. हे केवळ भावनिक वा धर्मिय मागणे नव्हे. या हिन्दुराष्ट्राची गरज सांगतांना असिदुद्दीन ओवेसी यांचे उदगार आवर्जून सांगितले जातात. कोणते ते? ओवेसी कुठेतरी म्हणाले, १५ मिनिटे पोलीस बंदोबस्त काढून घ्या. हिंदुंना पळता भुई थोडी करु. म्हणून याला उत्तर. हिंदू राज्य.. हिंदू राष्ट्र ! कायद्याचे राज्य नको? शिवाय तो ओवेसी बोलला हे खरेच कसे ? बऱ्याच बाबतीत तो संशयास्पद असतो. शिवाय हैदराबादचा नेता संपूर्ण भारताचा प्रातिनिधिक कसा? UAPA तर हातात आहे. करायचा बंदोबस्त. की उदगाराला वापराचे शस्त्र करायचे ? ओवेसी अलिकडचा. मागणी तर जुनी आहे.

त्यामुळे अशा तर्कात दम दिसत नाही. अजेंडा वेगळा असावा. कदाचित छुपा असेल. पाकिस्तानचेच अनुकरण कसे व का? की तेही केवळ वापरासाठी! बांगलादेशचे का नाही? त्यांचा तर आपल्यापेक्षा दोनने वय दर अधिक आहे. बालमृत्युत कमी व स्त्रीशिक्षणात जास्त तो देश आपल्यापेक्षा आहे. त्याची तुलना नाही. ते मुस्लिम राष्ट्र नाही. शेजारच्या चीनशी का नाही? ते बहुसंख्याक बौद्ध असूनही बौद्ध राष्ट्र नाही. श्रीलंकेचेही तसेच. बहुधा राष्ट्रे, अनुकरण वा अनुसरण त्याचेच करतात जी राष्ट्रउन्नत, प्रगत, विकसित आहेत! पाकिस्तान तर पिछाडीवर शून्य आहे! जी उन्नत आहेत, प्रगत आहेत ती धर्मराष्ट्रे नाहीत. एकही नाही! बहुसंख्यांक बौद्ध वा ख्रिस्ती असूनही एकही बौद्ध वा ख्रिस्ती राष्ट्र नाही. धर्मिय राष्ट्र ही कल्पनाच जगाला मान्य नाही.



त्यातून जग केव्हाच बाहेर पडलेले आहे

परतून संस्कृतीकडे...! रिव्हर्स व्यवस्थायन...! जायचे असेल तर जावे. या देशातील हिंदुंच्या सहमतीने होत असेल तर कोण रोखेल? पण धुप्पलमध्ये नको. नंतर आम्हाला कळलेच नाही असे म्हणू नये ! वेळ आणि संधी परत येत नसते. आधी औषध कळून जायचे ! कडू आहे गोड ? आता शुगरकोटेड असते. कळत नाही. म्हणून शांततेत विचार व्हावा. शिक्षणाचे भगवेकरण म्हणजे नेमके काय? हिंदू राज्य, हिंदू अस्मिता, हिंदू कायदा म्हणजे नेमके काय? आदिवासी, दलित, ओबीसी या ओळखीला स्वीकृती व तरतुदी आहेत. त्या संपतीलच ! हिंदुत हे सर्व कशाला? आताच फुकटे, मुफ्तखोर हिनवणे सुरू असते. कायदा व कायद्याचे संरक्षण यात सुरक्षित असलेली व्यवस्था ही सहजच नवी समाजव्यवस्था व तिच्या वर्चस्वाच्या भावना इकडे सरकून जाईल. कळणारही नाही. अशी नवी व्यवस्था यावी म्हणून या देशातील खूला व धनी वर्ग आसुसून आहे. त्याची हातमिळवणी झालीच आहे. तो कशाला थांबेल? त्यांच्या सोयीचे कायदे होतील. Reforms, व्यवस्थापरिवर्तनच्या नावे कृतीसह व्याख्या , धोरणे बदलत आहेतच ! असे हिन्दू राष्ट्र? मतांची मत्ता... अशीही अनुभवायला येते आहे.

नागड्या साधूंपूढे पंतप्रधान पद हलते म्हणजे काय ? व्यक्तिशः हलणे व पद हलणे वेगवेगळे आहे. देशापेक्षा श्रध्दा , आस्था मोठी कशी? सरण-मरण दारावर असताना महामंडलेश्वराला विनंती करावी लागते? हिंदूराष्ट्राची मुळं अशी रुतली दिसतात. आणि ते कोण साधू? हताश, निराश, बेजारांचा भरणा नसेल कशावरून? प्रवासी मजुरांना हाताळताना किती कठोर झाले. नागडे-उघडे साधू हाताळताना कमालीची सौम्यता! तरीही उत्पादक-अनुत्पादक असा भेद केलेला नाही? तो लिजेंड राजकपूर आठवून जातो. त्याने जिस देशमे गंगा बहती है... सिनेमा केला होता. सिनेमा खूप चालला. तो म्हणायचा.., हम उस देशके वासी है जिस देशमे गंगा बहती है...! कालांतराने याच राजकपुरने.., राम तेरी गंगा मैली.. सिनेमा तयार केला. कारणही स्पष्ट केले. तोही चालला.तिथे तो म्हणायचा, राम तेरी गंगा मैली होगई.. पापीयोंके पाप धोते धोते .. ! कोण शहाणा ? अव्यक्त असणे, मत न देणे, राजकीय मत नसणे ही कृती-अभिव्यक्तीची कोणती बाजू? चांगली तर खचितच नाही. मत द्यावे , मताचे चार करावे हे खरे प्रसंगावधान! कारण हिन्दूराष्ट्र योजना ही केवळ धर्मिय बाब नाही. ती सत्ता व संसदेशी संलग्न आहे. भविष्यातील सर्व आचरण व निर्मितीची पाठशाळा असेल. प्रभावक्षेत्राचा विचारही करु शकणार नाही इतके विस्तारित व गडद असेल. ती कट्टर मुसलमानांच्या प्रतिक्रियेपूरती सिमित बाब नाही. व्यवस्थेचे उलट ( रिव्हर्स ) परिवर्तन हा त्याचा गाभारा आहे. हे समजून घेतांनाच, प्रामुख्याने हिंदुंना.. अव्यक्ततेची मौनता , आधी त्यागावी लागेल.. आधी तोडावी लागेल .. !

**प्रा.रणजित मेश्राम, नागपूर**

# जिल्ह्यातील तीन शाळांवर संक्रांत



वरिष्ठांकडून जिल्ह्यातील अनधिकृत शाळांबाबत सुचना मिळाल्या असून जिल्ह्यात तीन अनधिकृत शाळा आढळून आल्या आहेत. दरम्यान, आमगाव व सालेकसा तालुक्यातील शाळा बंद करण्यात आल्या असून येथील शाळेला नोटीस बजावण्यात आली आहे. विशेष म्हणजे, स्थानिक स्तरावर या प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.

**खंडेलवाल, शिक्षण विभाग, जि.प.गोंदिया**

**गोंदिया:** राज्य शासाचे ना हरकत प्रमाणपत्राशिवाय शाळा सुरु करणारे किंवा शासनाकडून मान्यता काढण्यात आल्यानंतरही शाळा सुरु ठेवणाऱ्या शाळांना अनाधिकृत घोषित करण्यात येते. यानुसार राज्यात यूडायस अंतर्गत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात राज्यातील ६७४ शाळा अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, या शाळा बंद करण्याचे नोटीस शिक्षण विभागाकडून संबंधित शाळा व्यवस्थापकांना देण्यात आले आहे. या अनाधिकृत शाळांच्या यादीत जिल्ह्यातील तीन शाळांचा समावेश असून यातील दोन शाळा बंद करण्यात आल्या असून एका शाळेला शिक्षण विभागाकडून नोटीस बजावण्यात आली आहे.

यूडायसतर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात राज्यातील ६७४ शाळा या अनाधिकृत आढळून आल्या. दरम्यान, संबंधित शाळा सुरु राहिल्याने तेथील कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांची फसवणूक होण्याची शक्यता असल्याचे नमूद करत प्राथमिक शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी अनाधिकृत शाळांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. नियमानुसा अनाधिकृत शाळांना एक लाख रुपये दंड आणि शाळा बंद करण्याच्या सुचना देण्यात आददृात सांगितले. तर सुचना देऊनही शाळा सुरु राहिल्यास प्रति दिन नहा हजार रुपये दंड ठोठावण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. यूडायस २०२०-२१ नुसार राज्यातील ६७४ प्राथमिक आणि माध्यमिक शाळा अनाधिकृत असल्याचे निदर्शनास आले असता अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध करण्याची आणि कारवाईची मागणी काही शिक्षण संघटनांकडून करण्यात आली होती. या पार्श्वभुमीवर शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत टेमकर यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबईतील शिक्षण निरीक्षकांना परिपत्रकाद्वारे सुचना देऊन या शाळा बंद करण्याचे निर्देश दिले आहे. तर अनधिकृत शाळा सुरु राहिल्यास संबंधित शाळेच्या व्यवस्थापनास एक लाख रुपये दंड आणि सुचना देऊनही शाळा बंद न केल्यास प्रति दिन १० हजार रुपये दंड ठोठावण्यात यावा. दंड वसूल करण्याबाबत शासनाच्या २०१२ च्या राजपत्रानुसार निश्चित केलेल्या कार्यकक्षेनुसार कारवाई करुन अहवाल सादर करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, जिल्ह्यातही शिक्षण विभागाकडून तपासणी करण्यात आली असता आमगाव, सालेकसा व देवरी या तालुक्यातील तीन शाळा अनधिकृत असल्याचे आढळून आले आहे. यानुसार आमगाव व सालेकसा तालुक्यातील दोन्ही शाळा बंद करण्यात आल्या असून देवरी तालुक्यातील एका शाळेला नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती आहे.

**अशा आहेत सुचना**

राज्य मंडळाशी संलग्नीत शाळांसाठी राज्य शासनाचे परवानगी आदेश, सीबीएसई, आयसीएसई आयबी आदि मंडळाशी संलग्नीत शाळांकरिता राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्राशिवाय शाळा सुरु करण्यात आली असल्यास आणि मान्यता काढून घेतलेली शाळा सुरु असल्यास त्या शाळेला अनधिकृत शाळा म्हणून घोषित करावे, अशा सूचना शिक्षण विभागाला प्राप्त झाल्या आहेत.

**ही होणार कार्यवाही**

प्राथमिक शिक्षण संचालक यांच्या सुचनेनुसार अनधिकृत ठरलेल्या शाळांची यादी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहीर करावी. अनधिकृत शाळेमध्ये पाल्यासाठी प्रवेश घेऊ नये, संबंधित शाळेत प्रवेश घेतल्यास शैक्षणिक नुकसान होईल. अशी स्पष्ट सुचना असलेला फलक शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ लावून तो कोणी काढणार नाही याची खबरदारी घ्यावी. अनधिकृत शाळांची अद्ययावत यादी जिल्हास्तर, तालुकास्तर कार्यालयाच्या आवारात लावण्यात यावी, अशा स्पष्ट सुचना देण्यात आलेल्या आहे.

**जिल्ह्यातील अनधिकृत शाळा**

सर्वेक्षणात जिल्ह्यातील तीन शाळा अनधिकृत आढळून आल्या असून यात आमगाव तालुक्यातील रिसामा येथील बुद्धीस्ट इंटरनॅशनल स्कूल, सालेकसा तालुक्यातील साखरीटोला येथील बुद्धीस्ट इंटरनॅशनल स्कूल तर देवरी तालुक्यातील चिचगड येथील सुभद्रादेवी स्कूल या शाळांचा समावेश असून यातील साखरीटोला व रिसामा येथील बुद्धीस्ट इंटरनॅशनल स्कूल बंद करण्यात आली असून चिचगड येथील शाळेला नोटीस बजावण्यात आली आहे.

# पांगोली नदीतील प्रदुषण समस्या संपुष्टात



**गोंदिया:** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील पांगोली नदीचे पात्र स्वच्छ करण्यासाठी स्थानिक नागरिक,शेतकरी व सामाजिक संस्थांनी स्वयंस्फूर्त पांगोली नदी स्वच्छता अभियान राबवून पांगोली नदी पात्रातील वाढत्या प्रदुषणाची समस्या संपुष्टात आणण्यात आली. जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांना हिरिरीने पुढे येण्याचे आवाहन करीत १५० नागरिकांनी श्रमदान केले.

पांगोली नदीच्या विकासात्मक समस्यांप्रती नागरिकांत जनजागृती करून लोकसहभाग एकत्रित करण्याच्या हेतूने रविवारी सकाळी ६ ते ९ दरम्यान फुलचूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील पतंगा मैदान परिसरात स्वयंस्फूर्तीने नागरिकांनी श्रमदान केले. पांगोली नदीचे संरक्षण, संवर्धन, पुनरुज्जीवन व विकास करण्यासाठी पांगोली नदी पात्रातील वाढत्या प्रदुषणाची समस्या कायम संपुष्टात आणण्यात आली. जिल्ह्यातील जीवनदायींनी पण सद्द:स्थितीत नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या पांगोली नदीच्या अनेक विकासात्मक समस्यांपैकी एक प्रमुख समस्या म्हणजे नदीत नागरिकांद्वारे टाकण्यात येणारे निर्माल्य, प्लास्टिक व काचेचे तुकडे, पॉलिथीन, मेडीकल वेस्टेज, देवी-देवतांचे फोटो, राईस मिल्स लाख कारखाने सारख्या औद्योगिक उपक्रमांमुळे सोडले जाणाऱ्या दुषित सांडपाण्यामुळे होणारे नदीचे जल प्रदुषण ही समस्या आहे. पांगोली नदी स्वच्छता उपक्रम यशस्वी समाजोन्नती बहुउद्देशिय ग्रामीण व शहरी विकास संस्थेचे सचिव तीर्थराज उके, फुलचूरचे सरपंच मिलन रामटेक्कर, खमारीचे सरपंच होमेंद्र भांडारकर, चुलोदचे सरपंच लतिश बिसेन, खमारीचे पं.स.सदस्य कनिराम तावाडे, अनिल शरणागत, चित्रकला चौधरी, राजेंद्र जगताप, दीपक कदम, अनिल काळे, गुरूदेव सेवा मंडळ फुलचूरचे आचार्य एम.ए. ठाकुर आदिंनी सहकार्य केले.



# ४जी ग्राहकांसाठी जिओ ची धमाका ऑफर

## जिओफोन नेक्स्ट वर २००० रुपये सूट

तुमच्या घरी कोणताही जुना ४ऋ फोन असल्यास, तुम्ही जिओफोन नेक्स्ट वर २००० रुपयांची सूट सहज मिळवू शकता. रिलायन्स रिटेलने मर्यादित काळासाठी जिओफोन नेक्स्ट मएक्सचेंज टू अपग्रेडफ ऑफर लाँच केली आहे. जिओफोन नेक्स्टची किंमत ६४९९ रुपये आहे, जी डिस्काउंटनंतर ४४९९ रुपये होईल. परवडणारा स्मार्टफोन जिओफोन नेक्स्ट बनवण्यासाठी रिलायन्स जिओ आणि गुगलने एकत्र संशोधन केले आहे.




ऑफर अंतर्गत कोणत्याही कंपनीचा ४G फीचर फोन किंवा स्मार्टफोन दिला जाऊ शकतो. जुना जिओ फोन देऊन ग्राहकांना २००० रुपयांची सूटही मिळू शकते. म्हणजे तुमच्याकडे जुना ४G फीचर फोन असला तरीही तुम्ही या ऑफरचा लाभ घेऊ शकता. सवलतीचा लाभ घेण्यासाठी, तुम्हाला तुमच्या जवळील जिओमार्ट आणि रिलायन्स डिजिटल स्टोअरला भेट द्यावी लागेल आणि ४G फोन द्यावा लागेल. यानंतर तुम्हाला ६५९९ रुपयांचा जिओफोन नेक्स्ट फक्त ४४९९ रुपयांमध्ये मिळेल.

जिओफोन नेक्स्ट लाँच करताना, रिलायन्स इंडस्ट्रीजचे सीएमडी मुकेश अंबानी म्हणाले होते की “ज्या भारतीयांना इंग्रजी किंवा त्यांच्या स्वतःच्या भाषेत सामग्री वाचता येत नाही ते या स्मार्ट डिव्हाइसवर त्यांच्या स्वतःच्या भाषेत भाषांतर करू शकतात आणि वाचू शकतात”. मला सांगायला अभिमान वाटतो की आम्ही ‘इंडिया’ आणि ‘भारत’ मधील दरी कमी करत आहोत कारण भारत प्रगती जड सह डिजिटल प्रगती करेल.

या स्मार्टफोनमध्ये अनेक उत्कृष्ट फीचर्स आहेत. त्याच्या कॅमेरामध्येच भाषांतर वैशिष्ट्य आहे. ट्रान्सलेशन फीचरच्या माध्यमातून कोणत्याही भाषेतील मजकुराचा फोटो काढून तुम्ही ते तुमच्या स्वतःच्या भाषेत भाषांतरित करू शकता आणि ते ऐकूही शकता. जिओफोन नेक्स्ट मध्ये मॅन्युअल टायपिंगची कोणतीही अडचण नाही. लाइव्ह ट्रान्स्क्राइब ॲप वापरून तुम्ही तुमच्या स्वतःच्या भाषेत सहजपणे टाइप करू शकता. तुम्ही त्यात जढऋसपोर्ट असलेला पेनड्राइव्ह टाकूनही वापरू शकता.



# विधवा प्रथांना बंदी;महिलांचा सामाजिक सन्मान

कोल्हापूर... राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जिल्हा. शाहू विचारांची कास धरुन विकासाची वाटचाल करणाऱ्या या पुरोगामी जिल्ह्यातील हेरवाड गावाने ५ मे २०२२ रोजी “विधवा प्रथा बंदी’ चा ठराव करून फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा वसा आपल्या कृतीतून जपला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील सुमारे नऊ ते दहा हजार लोकवस्तीच्या हेरवाड गावाने आज राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. गावात विधवा प्रथा बंद करण्याचा सर्वानुमते ठराव करून त्यास ग्रामसभेची मंजुरी घेतली. गावचे सरपंच सुरगोंडा पाटील आणि ग्रामविकास अधिकारी पल्लवी कोळेकर यांच्या विशेष प्रयत्नातून या ठरावाला पाठबळ मिळाले.

अनेक सामाजिक प्रथा आणि परंपरेने विधवा महिलांच्या जगण्या-वागण्यावर मर्यादा येतात. अनेक वाईट प्रसंगांना त्यांना सामोरे जावे लागते. समाजात वावरताना विधवा म्हणून असणारे दडपण, यातून त्यांची होणारी अवहेलना, मानसिक, सामाजिक कुचंबना अशा साऱ्या दिव्यातून जात असताना त्यांच्या जगण्याची परवड होते. समाजात विधवा महिलांना मिळणारे दुय्यम स्थान, शुभ कार्यातील मान सन्मानापासून वंचित राहत, अनेक गोष्टींचा सामना त्यांना करावा लागतो. मात्र आता हेरवाड गावाने घेतलेल्या या “विधवा प्रथा बंद’ ठरावामुळे गावात महिलांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळण्याबरोबरच समाजात सन्मानाची वागणूकही मिळणार आहे.

**हेरवाड गावाने ग्रामसभेत घेतलेला निर्णय......**

आपल्या समाजात पतीच्या निधनावेळी, अंत्यविधीवेळी पत्नीच्या कपाळावरचे कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढणे तसेच महिलांना विधवा म्हणून कोणत्याही प्रकारचे धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. कायद्याने प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्याचा समान अधिकार आहे. या प्रथेमुळे या अधिकारावर गदा येत आहे म्हणजेच कायद्याचा भंग होत आहे, तरी आपल्या गावामध्ये व देशामध्ये विधवा महिलांना सन्मानाने जगता आले पाहिजे याकरिता “विधवा प्रथा बंद’ करण्यात येत आहे. यासंदर्भात गावामध्ये जनजागृती करण्यात यावी त्यास ही सभा मंजुरी देत आहे, असा ठराव ग्रामसभेने सर्वानुमते मंजूर केला. या ठरावाच्या सुचक मुक्ताबाई संजय पुजारी असून ठरावास सुजाता केशव गुरव यांनी अनुमोदन दिले आहे.




हेरवाड गावाने गावात विधवा प्रथा बंद करून महिलांना सन्मान देऊन राज्यासह देशात एक आदर्श निर्माण केला आहे. हेरवाड गावच्या निर्णयाचे राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अनुकरण करावे असाच हा निर्णय आहे.

**हेरवाडच्या निर्णयाची राज्य शासनानेही घेतली दखल**

समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट व्हाव्यात यासाठी हेरवाड गावाने घेतलेल्या “विधवा प्रथा बंद’ या निर्णयाची दखल राज्य शासनाने त्वरित घेतली. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री महोदयांनी या निर्णयाचे स्वागत करुन गावकऱ्यांना धन्यवाद दिले. ग्रामविकास विभागाने तर १७ मे २०२२ रोजी समाजात प्रचलित असलेल्या अनिष्ट विधवा प्रथेचे निर्मूलन व्हावे यासाठी शासन परिपत्रक काढले. राज्यातील सर्व ग्रामपंचायतीने हेरवाड गावचा आदर्श घेऊन आपल्या गावातही असा निर्णय घ्यावा आणि याबाबतची जनजागृती करावी याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचित केले आहे.

**हेरवाड गावचे अनुकरण करा**

हेरवाडच्या क्रांतीकारक निर्णयाची ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दखल घेवून ग्रामविकास विभागाच्या वतीने याबाबत परिपत्रक काढले. विधवा महिलांना इतर महिलांप्रमाणे सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. स्त्रियांच्या अधिकाराचे हनन होऊ नये यासाठी हेरवाड गावचे अनुकरण करावे व त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराने महाराष्ट्र राज्याची वाटचाल सुरु असून राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने विधवा प्रथा बंद करण्याचा निर्णय घ्यावा. यावर्षी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त कृतज्ञता पर्व सुरु आहे. गावात विधवा प्रथा बंद करण्याचा निर्णय घेऊन राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वसा पुढे नेऊया, हीच छत्रपती शाहू महाराजांना खरी आदरांजली ठरेल, असा विश्वास ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला आहे.

**हेरवाड गावचा सार्थ अभिमान**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षात हेरवाड गावाने विधवा प्रथा बंद करण्याचा निर्णय घेऊन शाहू राजांच्या विचारांचा वसा जपला आहे. जिल्ह्यातील हेरवाड गावाने हा निर्णय घेऊन शाहू महाराजांना एक अनोखे अभिवादन केले आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री व एक कोल्हापूरकर म्हणून हेरवाड ग्रामस्थांनी घेतलेल्या निर्णयाचा सार्थ अभिमान वाटतो, अशी प्रतिक्रिया पालकमंत्री सतेज पाटील यांनी व्यक्त केली.

**हेरवाडचा निर्णय स्वागतार्ह**


विधवा प्रथा बंद करून महिलांना सन्मानाची वागणूक देण्याचा हेरवाड गावाने घेतलेला निर्णय क्रांतिकारी व स्वागतार्ह आहे. या निर्णयाचे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अनुकरण करावे. शासनानेही या निर्णयाची जनजागृती व अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक काढले आहे. कोल्हापूर हा शाहू राजांच्या विचारांवर पुढे जाणारा जिल्हा असून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती हेरवाडच्या निर्णयाचे अनुकरण करतील, असा विश्वास जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी व्यक्त केला आहे.

“विधवा प्रथा बंद’ हा हेरवाड गावाने घेतलेला निर्णय क्रांतिकारी असाच म्हणावा लागेल. या निर्णयामुळे विधवा महिलांना सन्मान मिळून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल. गावाने घेतलेल्या या निर्णयाची नोंद सुवर्ण अक्षराने घेण्यासारखी असून या निर्णयाचे प्रत्येक गावाने स्वागत करुन हा निर्णय आपल्या गावातही घ्यावा, हीच अपेक्षा...

**एकनाथ पोवार**
**माहिती सहायक**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता ,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शेतकऱ्यांसाठीची 'ग्रामकृषी समिती' कागदोपत्रीच



**देवरी:** राज्य ग्रामपंचायत अधिनियमनुसार प्रत्येक गावांत ग्रामपंचायतीमध्ये ग्रामकृषी विकास समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गावातच कृषी विषयक योजनाची माहिती व मार्गदर्शनासाठी ग्रामकृषी विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या मार्गदर्शनाचा लाभ किती शेतकऱ्यांना झाला हा संशोधनाचा विषय असून, या समित्या कागदोपत्रीच असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे बहुतांश शेतकऱ्यांना तर ग्रामकृषी विकास समिती असते, हे देखील माहिती नसल्याचे प्रत्यक्ष शेतकऱ्यांची भेट घेतली असता निर्दशनास आले आहे.

शेतकऱ्यांना शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी, गावातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या विविध योजना व प्रकल्पामधून हाती घ्यावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी, राज्य ग्रामपंचायत अधिनियमानुसार प्रत्येक गावात ग्रामपंचायतीमध्ये ग्रामकृषी विकास समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गावातच कृषिविषयक योजनाची माहिती व मार्गदर्शन मिळावे, यासाठी शासनाच्या निदेर्शानुसार राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामकृषी विकास समिती स्थापन करण्यात आली. गोंदिया जिल्ह्यातील ५४८ ग्रामपंचायतींमध्ये १४ सदस्यीय ग्रामकृषी विकास समिती स्थापन करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील काही ठराविक नागरिक पुन्हा-पुन्हा शासनाच्या योजनाचा लाभ घेतात. त्याला चाप बसावा. शासनामार्फत संचालित विविध कृषी विषयक योजना व उपक्रमांची माहिती या समित्यांमार्फत शेतकऱ्यांना मिळावी, अशी अपेक्षा या समित्या स्थापन करते वेळी होती. परंतु जिल्ह्यातील किती समित्या या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात हा संशोधनाचा विषय आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही शेती व्यवसायशी निगडित असते. परंतु हवामानातील बदल, निसगार्चा अनियमितपणा, पर्जन्यमान, कीडरोग, सुधारित जातींची बियाणे उपलब्ध न होणे, शेतमालाच्या दरामध्ये घसरण होणे आदी कारणांमुळे शेती व्यवसायातून शाश्वत उत्पन्न मिळेल, याची खात्री देता येत नाही. या सर्व समस्यांवर विचारविनिमय करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने ग्रामकृषी विकास समिती प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्थापन करण्याचा निर्माण घेतला. कृषी योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोचवणे, शेतकऱ्यांपर्यंत कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, बियाणे, खते, कीड नियंत्रण, यांत्रिकीकरण, संरक्षण, शेती व फळबाग लागवडी विषयक माहिती शेतकऱ्यांना पोचवली जाणार होती.

### समितीत सहभाग कोणाचा?

**ग्रामकृषी विकास समितीत १४ सदस्य असतील. यामध्ये सरपंच समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. उपसरपंच पदसिद्ध सदस्य असतील. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी सदस्य सचिव तर कृषी सहाय्यक सहसचिव असतील. शिवाय ग्रामपंचायत सदस्य, तीन प्रगतशील शेतकरी, त्यामध्ये एक महिला, विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे अध्यक्ष, शेतकरी उत्पादक कंपनी किंवा शेतकरी गटांचा एक प्रतिनिधी, महिला बचत गटाचा एक प्रतिनिधी, कृषीपूरक व्यवसायातील दोन शेतकरी आणि तलाठी अशा १४ प्रतिनिधींचा समावेश समितीत करण्यात आला आहे आहे.**

दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, रेशीम लागवड आदी शेतीपूरक व्यवसायाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी समितीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निमंत्रित करावयाचे होते. पीक काढणी तंत्रज्ञान व बाजारपेठेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी, शेतीसाठी आवश्यक कर्जपुरवठा करणाऱ्या बँका, सहकारी संस्थांची माहिती तसेच स्थानिक पातळीवर निर्माण होणाऱ्या कृषीविषयक प्रासंगिक समस्यांवर विचारविनिमय करून कृषी विभागाच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. याबाबतची कार्यवाही समितीच्या माध्यमातून केली जाणे अपेक्षित होते. कृषी सहायकाच्या समन्वयाने ग्रामसेवकांनी सभांचे आयोजन करावयाचे होते. प्रत्येक महिन्यातून किमान एक सभा होणे आवश्यक होते. मात्र केवळ औपचारिकता म्हणून या समित्या स्थापन करण्यात आले आहेत. या समित्यांच्या कुठेही फायदा शेतकऱ्यांना होतांना दिसून येत नाही. विशेष म्हणजे, बहुतांश शेतकऱ्यांना या समिती विषयी माहितीच नसल्याचे वास्तव पुढे आले आहे. आपल्याला आजपयंर्त कृषी विषयक मार्गदर्शन मिळालेला नाही. ग्रामपंचायतीमध्ये कृषी विषयक मार्गदर्शनासाठी ग्रामकृषी विकास समिती असते, याची माहिती नसल्याचे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी सांगितली आहे.

# मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे पावसळ्यापूर्वी पूर्ण करा आमदार-मनोहर चंद्रिकापुरे



**अर्जुनी/मोरगाव:** तालुक्यातील ग्राम बोळदे/ करड व ताडगाव येथे मातोश्री ग्राम समृद्धी पांदन रस्त्यांचे आमदार चंद्रिकापुरे यांचा हस्ते भूमिपूजन पार पडले. यावेळी बोलतांना कृषिमालाची वाहतूक करण्यासोबतच शेती यंत्रसामग्री घेऊन जाण्यासाठी चांगल्या शेतरस्त्यांची आवश्यकता आहे. यासाठी मातोश्री पाणंद रस्त्यांच्या कामांना गती देऊन मंजूर पाणंद रस्ते पावसळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश आमदार चंद्रिकापुरे यांनी दिले.

अर्जुनी/मोर तालुक्यातील ग्राम बोळदे/करड येथील रोहिदास राणे ते भूषण आरसोडी यांच्या शेतापर्यत तसेच ताडगाव येथील रूपचंद नाकाडे ते मुखरू गहाणे यांच्या शेतापर्यंत, असे एकूण ४८ लक्षाचे मातोश्री ग्राम समृद्धी पांदन रस्त्यांचे मा. आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचा हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी आमदार मनोहर चंद्रिकापुरे म्हणाले की, शेती व शेतीपूरक उद्योग-व्यवसायांचा विकास होण्यासाठी पाणंद रस्त्याची निर्मिती होणे आवश्यक आहे. शेतमाल बाजारात पोहचविण्यासाठी तसेच यंत्र सामग्री शेतापर्यत जाण्यासाठी शेतीला चांगल्या शेतरस्त्यांची गरज आहे. मातोश्री पाणंद रस्ता योजनेचा लाभ शेतकऱ्यांना त्वरित मिळावा यासाठी पावसाळ्यापूर्वी म्हणजेच १५ जूनपर्यंत पाणंद रस्त्यांचे काम पूर्ण करावे. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत मागेल त्याला काम उपलब्ध करुन द्यावे. ज्या गावात रोहयोच्या कामांवर मजुरांचा प्रतिसाद चांगला आहे, तेथे आवश्यकतेनुसार नवीन कामे हाती घ्यावीत. यामुळे स्थानिक मजुरांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांना आर्थिक स्थैर लाभेल. आर्थिक दुर्बल तसेच अकुशल कामगारांच्या हाताला काम मिळावे, हा रोजगार हमी योजनेचा मूळ उद्देश असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी यशवंत गणवीर उपाध्यक्ष जि. प. गोंदिया, सविताताई कोडापे सभापती पं. स. अर्जूनी मोरगाव, पौर्णिमाताई ढेंगे जि. प. सदस्या, लोकपाल गहाणे तालुका अध्यक्ष राकाँप, होमराज पुस्तोडे उपसभापती पं.स अर्जुनी मोरगाव, कुंदाताई लोगडे पं.स. सदस्य, नुतनलाल सोनवणे पं. स. सदस्य विनोद मेश्राम तहसीलदार, विलास निमजे गट विकास अधिकारी, मीनाताई लंजे सरपंच बोळदे/करड, मनोज तुमडाम उपसरपंच, भूमेश्वर बोरकर सरपंच ताडगाव, दामोधर शहारे उपसरपंच, पुण्यशील टेंभुणी, माणिक मेश्राम, मंदाताई लंजे, गीताताई उईके, समर्था टेंभुर्णे, रसिका लंजे, एन.सी. रामटेके सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, सुधीर कापगते, महारु मडावी, व्यंकट जांगडे, अशा नाकाडे, मनोहर पुस्तोडे, नितीन नाकाडे, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# काशिनाला येथील साठवणूक बंधाऱ्याची आता लवकरच निर्मिती होणार




**देवरी:** आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्रातील सालेकसा तालुक्यातील पांढरी/काशिनाला येथील साठवणूक बंधारा बांधकामाकरिता डिझाइन मंजुरीकरिता आपल्या स्थानिक आमदार निधीतून १ लाख ७७ हजार रुपये मंजूर करण्याकरिता जिल्हाधिकारी गोंदिया यांना २० मे रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. त्यामुळे, आता काशिनाला साठवणूक बंधाराची लवकरच निर्मिती होण्याचे मार्ग मोकडे होणार असल्याची माहिती या क्षेत्राचे आमदार सहषराम कोरोटे यांनी दिली.

आ.सहषराम कोरोटे यांनी सांगितले की, सालेकसा तालुक्यातील पांढरी/काशिनाला येथील प्रलंबित असलेले साठवणूक बंधारा बांधकामाची या भागातील शेतकऱ्यांची अनेक दिवसांपासून मागणी होती. याकरीता प्रकल्पाची बांधकामाच्या डिझाईन मंजूरी करीता वीएनआईटी नागपूर या संस्थेने १ लाख ७७ हजार रुपयांची मागणी केली होती. या मागणीला गांभीयार्ने घेत स्थानिक आमदार विकास निधीतुन सबंधीत कामाकरिता निधी मंजूर करावी, या आशयचे पत्र गोंदियाचे जिल्हाधिकारी यांच्या सह जिल्हा नियोजन अधिकारी व जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना पाठविले आहे. त्यामुळे, आता लवकरच काशीनाला साठवणूक बंधाराची निर्मिती होणार व क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मदत होणार असल्याची माहिती आमदार कोरोटे यांनी दिली.

### नरेंद्राचार्य महाराज पादुकादर्शन सोहळा गुरुवारला

**अर्जुनी मोरगाव :-** जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम यांचा पादुका दर्शन सोहळा गुरुवार २६मे रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा परिषद हायस्कूल अर्जुनी मोरगाव, च्या पटांगणावर आयोजित करण्यात आलेला आहे. गोंदिया जिल्ह्यातील साधक ,शिष्य, भक्तगण ,हितचिंतक व जिल्ह्यातील अध्यात्मवादी व विज्ञानवादी नागरिकांनी पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा निरीक्षक सुरेश लाखे,अध्यक्ष प्रकाश भोंडे यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील जंगलामध्ये ३ हजार ६१ वन्यप्राणी



**गोंदिया:** जिल्हा वनसंपदेने नटलेला जिल्हा असूनसू जिल्ह्यातील वनक्षेत्र वन्यप्राण्यांसाठी सुरक्षित मानले जाते.बुद्ध पौर्णिमेच्या रात्री सामाजिक संस्थांच्या मदतीने वन्यजीव विभागाकडून प्राण्यांची गणना करण्यात आली. दरम्यान, गोंदिया जिल्ह्यासह सात संरक्षित वनक्षेत्रामध्ये सर्ववगीय ३ हजार ६१ प्राणी संचार करीत असल्याचे दिसून आले. यामध्ये ६ वाघ, २३ बिबट या दोन प्रमुख प्राण्यांचा समावेश आहे.

गोंदिया जिल्ह्यात मोठयाप्रमाणात जंगलक्षेत्र आहे. त्यामुळे, गोंदिया जिल्हा वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातूनतू महत्त्वाचा मानला जातो. या अनुसंगाने या जिल्ह्यात राष्ट्रीय दर्जाचा नागझिरा अभियारण्य, नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान, व्याघ्र प्रकल्प तसेच जिल्ह्याशी सलंग्नित असलेल्या जिल्ह्यातील पिटेझरी, उमरझरी, कोका, बोंडे व डोंगरगाव या वनक्षेत्रामध्येही मोठयाप्रमाणात सर्ववगीय वन्यप्राणी संचार करतात. त्यामुळे गोंदिया जिल्हा पर्यटकांच्या दृष्टिकोनातून आकर्षणाचा केंद्र ठरू लागला आहे. परिणामी, दिवसेंदिवस पर्यटकांचा ओघ जिल्ह्यातील वनक्षेत्राकडे वाढत चालला आहे. दरवषीप्रमाणे यंदाही बुद्ध पौर्णिमेच्या चंद्ररात्री वन्यजीव विभागा कडून प्राणीगणना करण्यात आली. दरम्यान, गोंदिया जिल्ह्यातील संरक्षित वनक्षेत्रासह संलग्नित क्षेत्रामध्ये ३०६१ प्राणी संचार करीत असल्याचे समोर आले.

गोंदिया जिल्ह्यासह संलग्नित वनक्षेत्रात वन्यप्राण्यांची गणना करण्यात आली. यामध्ये नागझिरा, पिटेझरी, उमरझरी, कोका, नवेगावबांध उद्यान, बोंडे व डोंगरगाव संरक्षित वनक्षेत्राचा समावेश आहे. यामध्ये नागझिरा क्षेत्रात ५३८, पिटेझरी क्षेत्रात ३३३, उमरझरी क्षेत्रात १०९, कोका क्षेत्रात ६६६, नवेगावबांध उद्यानात ८८४, बोंडे क्षेत्रात ३३७ व डोंगरगाव क्षेत्रात १९४ असे एकूण ३०६१ सर्ववर्व गीय प्राणी दिसूनसू आले. यात ६ वाघ, २३ बिबट, ९५ अस्वल, १२१ रानकुत्रे,त्रे २ कोल्हे, ३७ मुंगूमुं गूस, दोन रानमांजर, २५ सालींदर, ८४० रानडुक्कर, ६८७ रानगवे, २०१ चितळ, १६ भेकर हरीण, १४४ निलगाय, १२१ सांबर, ६७ मोर, १ रानकोंबडा, ३ उदमांजर व माकड, वानर, घार, सुता सु रपक्षी, घुबडघु या प्राण्यांचा समावेश आहे.

### एफडीसीएमच्या कॅरीडोर परिसरात ५०० प्राण्यांची नोंद

**गोंदिया:** नवेगाव कॅरीडोरमध्ये येत असलेल्या एफडीसीएमच्या नियंत्रणाती जांभळी-१ व जांभळी-२ क्षेत्रामध्ये बुद्ध पौर्णिमेच्या रात्रीला सेवा संस्थेच्या सहकायार्ने उपविभागाकडून प्राणी गणना करण्यात आली. दरम्यान, सर्ववर्गीय ५०० प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये बिबट, अस्वल, निलगाय, चितळ, रानगवा, रानडुक्कर, मोर, रानमांजर आदी प्राण्यांचा समावेश आहे.

दरवर्षीप्रमाणे बुद्ध पौर्णिमेच्या रात्रीला गोंदिया जिल्ह्यातील वन्यजीव संरक्षित तसेच संलग्नित क्षेत्रामध्ये प्राणीगणना करण्यात आली. सडक अर्जुनी व गोरेगाव तालुक्यातील नागझिरा-नवेगावबांध कॅरीडोरमध्ये येत असलेल्या जांभळी-१ व जांभळी-२ या एफडीसीएमच्या वनपरिक्षेत्रामध्ये सेवा संस्थेचे स्वयंसेवी व वनकमचाऱ्यांनी जवळपास १५ मचानाच्या माध्यमातून प्राणीगणना केली. दरम्यान या क्षेत्रामध्ये एकूण ५०० प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये बिबट-७, अस्वल-८, रानगवा-८०, रानकुत्रे-२५, चितळ/हरीण-४०, चौसिंगा-२, रानडुक्कर-७७, माकड-२००, निलगाय-४६, मोर-१३, रानमांजर-२ या वन्यप्राण्यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे एक खार व दोन साळू या पक्ष्यांचीही नोंद झाली आहे. प्राणी गणनेत सेवा संस्थेचे अध्यक्ष सावण बहेकार, वनविकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक नितीन सिंग, वनपरिक्षेत्र अधिकारी नंदेश्वर, लांबट, सेवा संस्थेचे चेतन जसानी, अभिजित परिहार, शशांक लांडेकर, कन्हैय्या उदापुरे, पवन लटये, पवन सोयाम, नदिम खान, बंटी शर्मा, सिद्दी वडके आदि निसर्गप्रेमींचा समावेश होता.

# गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस किसान आघाडी जिल्हाध्यक्षपदी डॉ योगेंद्र भगत



**गोंदिया:-** गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस किसान आघाडीचे अध्यक्ष आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचा कामाचा व्याप वाढल्याने त्यांच्या जागी खासदार प्रफुल पटेल यांच्या आदेशानुसार प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या सम्मतीने जिल्हा परिषदेचे माजी सभापती डॉ.योगेंद्र भगत यांची किसान आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस किसान आघाडीचे महासचिव एफ.आर.टी.शहा यांनी जिल्हा परिषद निवडणुकीपूवी पक्षाचा राजीनामा दिल्याने त्यांचा राजीनामा पक्षांने स्वीकारून त्या ठिकाणी आदर्श गाव चिचटोलाचे प्रगतीशील शेतकरी मुनीश्वर यादवराव कापगते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीचे श्रेय डॉ योगेंद्र भगत व मुनीश्वर कापगते यांनी खासदार प्रफुल पटेल व अखिल भारतीय राष्ट्वादी काँग्रेसचे महासचिव व माजी आमदार राजेंद्र जैन यांना दिले आहे. त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या किसान आघाडीचे जिल्हा अध्यक्ष पदी व महासचीव पदी निवड झाल्याबद्दल जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष गंगाधर परशुरामकर, नरेश माहेश्वरी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर, डॉ.अविनाश काशिवार, प्रेमकुमार रहांगडाले, सुरेश हर्षे, सि.के. बिसेन, जि.प.सभापती पुजा अखिलेश सेठ, सुधा रहांगडाले, लोकपाल गहाणे, केवल बघेले, कमलबापू बहेकार, कुंदन कटारे, बाळकृष्ण पटले, केतन तुरकर, किशोर तरोणे, डी.यू रहांगडाले, योगेश नाकाडे, राजलक्ष्मी तुरकर, गणेश बरडे, डॉ अविनाश जयस्वाल, प्रभाकर दोनोडे, शिवाजी गहाने, डॉ रुकिराम वाढई सहीत अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे.

# आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात




**गोंदिया:** शिक्षणाचा अधिकार अधिनियम अंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या पाल्यांच्या नामांकित इंग्रजी शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश योजनेंतर्गत प्रतीक्षा यादीतील प्रवेश प्रक्रियेला शुक्रवार १९ मेपासून सुरुवात झाली आहे. निवड झालेल्या प्रतीक्षा यादीतील पालकांनी त्यांच्या पाल्यांचे प्रवेश करून घेण्याचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) कादर शेख यांनी केले आहे. बालकाचा मोफत व सक्तीचा आरटीई शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये वंचित व दुर्बल घटकातील पालकांकरिता इंग्रजी माध्यम विना अनुदानित शाळांमध्ये २५ टक्के मोफत प्रवेशाची तरतूद करण्यात आली आहे. प्रतीक्षा यादीतील बालकांना शुक्रवार १९ मेपासून तालुकास्तरावर प्रत्यक्ष प्रवेश देण्यास सुरुवात झाली आहे.

पालकांनी तालुक्याचे गटसाधन केंद्रस्थळी जाऊन आवश्यक दस्ताऐवजांच्या मूळ दस्ताऐवज व छायांकित प्रती सोबत घेऊन जाऊन प्रवेश निश्चित करावे. प्रवेशावेळी रहिवासी पत्त्याचा पुरावा, अर्ज भरतांना दर्शविलेले अंतर दस्ताऐवजांची तपासणी तालुकास्तरावर करण्यात येणार असून, चुकीची माहिती आढळून आल्यास तालुका तपासणी समितीकडून शहानिशा करुन प्रवेश देण्याचे अधिकार तालुका दस्ताएवज तपासणी समितीकडे अबाधित ठेवण्यात आले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद आहे. जिल्ह्यातील १४३ शाळांमध्ये पहिल्या फेरी अंती ६०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. २१३ विद्यार्थ्यांकरिता प्रतीक्षा यादीतील बालकांना १९ मे रोजी दुपारी ३ वाजतानंतर निवड झाल्याचे संदेश पालकांच्या भ्रमणध्वनीवर पाठविण्यात आले आहे. पालकांनी भ्रमणध्वनी संदेशावर अवलंबून न राहता आरटीई पोर्टल वरील अर्जाची स्थिती या टॅबवर आपल्या पाल्याचा अर्ज क्रमांक टाकून अजाची स्थिती पाहावी. १९ ते २७ मे २०२२ या कालावधीमध्ये कागदपत्रांची तपासणी करून आपल्या बालकांचे आभासी प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथ) कादर शेख यांनी केले आहे.

### चिचगड आदि.सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी संताराम भोयर व उपाध्यक्षपदावर भुवनलाल नरवरे



**चिचगड:** देवरी तालुक्यातील चिचगड येथील आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाकरीता २० मे रोजी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी संताराम भोयर व उपाध्यक्षपदावर भुवनलाल नरवरे यांची निवड करण्यात आली.

या संस्थेवर एकता किसान पॅनलचे १३ पैकी १३ सदस्य निवडून आले होते. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक जनार्धनजी कोल्हारे, जगदीशजी नरवरे, पोलीस पाटील संदीप कटकवार, अनिल घोटे, इंदल अरकरा, बालारामजी कुंजाम, भिवाजी भोयर, आणि सदाशिव मडावी उपस्थित होते.

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ३१ मे पर्यत अर्ज आमंत्रित

**भंडारा,:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांनी ३१ मे पर्यत अर्ज सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुकेशनी तेलगटे यांनी केले आहे.एससी व नवबौद्ध घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, दहावी, बारावी किंवा पदवी परीक्षेचे गुणपत्रक, बोनाफाईड सर्टिफिकेट, बँक खाते आधार संलग्न केल्याचा पुरावा, स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रमाणपत्र, विद्यार्थी जिथे राहतो त्याबाबत पुरावा, महाविद्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र यासह परिपूर्ण अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिव्हिल लाईन जिल्हा परिषद चौक, भंडारा या कार्यालयात ३१ मे, २०२२ पर्यत सादर करावे.

# खा.नेतेना भेटले शेतकऱ्यांच्या समस्यांना घेऊन ककोडीचे शिष्टमंडळ



**ककोडी:-** देवरी तालुक्यातील आदिवासी भाग असलेल्या ककोडी परिसरातील विविध समस्यांना घेऊन येथील कृषोन्नती शेतकरी प्रोड्युशर कंपनीच्या संचालक शिष्टमंडळाने मतदरासंघाचे खासदार अशोक नेते यांची भेट घेऊन चर्चा केली.

भेटीदरम्यान ककोडी क्षेत्रातील शेतकऱ्याच्या विविध समस्यावर सविस्तार चर्चा करण्यात आली. तसेच निवेदन देण्यात आले. त्यामध्ये शेतकरी कृषी पंपानां लवकर विद्युत कनेक्शन जोळणी करुन देणे,कृषी कर्ज, रब्बी धान खरेदी करण्यात येणाऱ्या अडचणी तसेच ककोडीला येथे नविन मोबाईल टाँवरची लवकर व्यवस्था करणे आदी मागण्यांचा समावेश होता.

खासदार नेते यांनी सर्व विषयांवर लवकर कार्यवाही करून शेतकर्यांची सर्व समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी शेतकरी प्रोडयुसर कंपनी संचालक मंडळाचे अध्यक्ष मनेंन्द्र मोहबंशी, मनोज मेश्राम (सचिव), चंदण हिरवाणी (कोषाध्यक्ष), जोहारी कुंभरे (सहसचिव), दिलीप अमरवाडे (संचालक) व शेतकरी प्रोड्युसरचे सभासद उपस्थित होते.

# मानव विकास अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाला आयुक्तांची भेट



**गोंदिया:** जिल्ह्यात मानव विकास कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची मानव विकास आयुक्त नितीन पाटील यांनी १९ व २० मे रोजी स्थळ पाहणी केली. त्यांनी विविध प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेतली व चर्चा केली. त्यांच्या या दौऱ्याने मानव विकासाच्या योजना राबविणाऱ्या यंत्रणांना नवा आत्मविश्वास मिळाला.

तिरोडा, अर्जुनी मोरगांव, देवरी या तालुक्यात मानव विकास कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची स्थळ पाहणी केली. तिरोडा तालुक्यात महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत सीएमआरसी व लाभार्थी महिला बचत गटांसोबत चर्चा करून दुग्ध संकलन वाहन पुरविणे या योजनेबाबत आढावा घेतला.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात एमएसआरएलएम (उमेद) अंतर्गत लाभार्थी महिला बचत गटांसोबत चर्चा करून केशोरी मिरची पावडर व्यवसाय, पोल्ट्री युनिट स्थापन करणे आणि मत्स्यबीजोत्पादन निर्मिती व विक्री केंद्र या योजनांचा आढावा घेतला. देवरी तालुक्यात एमएसआरएलएम (उमेद) अंतर्गत लाभार्थी आदिवासी महिला बचत गटांसोबत चर्चा करून वन उपज संकलन व खरेदी विक्री केंद्र या योजनेचा आढावा घेतला. पळसाच्या झाडावर लाख निर्मिती कशा पद्धतीने करण्यात येते याबाबत चर्चा केली. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत लाभार्थी महिला बचत गटांसोबत चर्चा करून तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस योजनेचा आढावा घेतला.

मानव विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत रोजगार निर्मिती विषयक विशेष योजनेअंतर्गत पोल्ट्री मदर युनिट स्थापन करणे या योजनेस एमएसआरएलएम उमेद अंतर्गत कार्यरत आदिवासी अनुसूचित जाती-जमाती आदिवासी महिला बचत गटास ९० टक्के शासन हिस्सा व दहा टक्के लाभार्थी हिस्सा या तत्वावर निधी वितरीत करण्यात आला होता. सदर योजना अर्जुनी मोरगाव या तालुक्यात राबविण्यात आलेली आहे. या युनिटला भेट दिल्यानंतर आयुक्तांनी चक्क जमिनीवर बसून माहिती घेतली.

एकंदरीत निरीक्षणांत आयुक्तांनी आजिवीका वाढवण्यासाठी विशेष योजना राबविण्याकरीता सूचना दिल्या. संपूर्ण पाहणी दरम्यान जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) एस.बी.पाचखेडे, जिल्हा समन्वय अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ संजय संगेकर तसेच माविम व उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक नरेंद्र रहांगडाले व पदाधिकारी उपस्थित होते.

### आयुक्तांचा साधेपणा

**स्थळ पाहणी दौऱ्यात मानव विकास आयुक्त नितीन पाटील यांचा साधेपणा योजना अंमलबजावणी अधिकाऱ्यांची मउमेदफ वाढवणारा होता. अर्जुनी मोरगाव येथील पोल्ट्री युनिटला भेट दिल्यानंतर त्यांनी चक्क जमिनीवर बसून प्रकल्पाची विस्तृत माहिती स्वतःच्या डायरीत लिहली. प्रकल्प पाहणी करतांना कुठलाही बडेजाव न करता आयुक्तांनी आपल्या साधेपणाचे दर्शन उपस्थितांना घडविले. त्यांच्या या दौऱ्याने मानव विकासाच्या योजना राबविणाऱ्या यंत्रणांना नवा आत्मविश्वास मिळाला.**


# ई-निविदा सुचना

## जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांच्याकडून सर्व मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते की,गोंदिया जिल्ह्यातील सन 2022-23 या वर्षाकरिता वाळूगटांच्या राज्यस्तरीय (SEAC व SEIAA) पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी From IM, EIA, EMP, व MIning Plan, District Survey Report तयार करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. ई-निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती https://gondia.nic.in व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ई-निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 16/06/2022 रोजी संध्याकाळी 5.45 वाजे पर्यंत आहे.

दिनांक:- /05/2022

(राजेश खवले)
अपर जिल्हाधिकारी, गोंदिया

संचालक-नाग. /१०७/२०२२

# पांगोली नदी खोलीकरण व रुंदीकरणाचा प्रस्ताव शासनास सादर

## पांगोली उगम ते संगमापर्यंत ५९ बंधाऱ्याचे बांधकाम



**गोंदिया :** पांगोली नदीपात्रातुन साचलेला गाळ काढुन नदी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण केल्यास नदीकाठावरील गावातील पाणी टंचाई दूर होऊन पर्यायाने शेतकऱ्यांना बारमाही सिंचनासाठी पाणी साठा उपलब्ध होईल व परिसरातील गावांना पुराचा धोका कमी होईल. याकरिता प्रातिनिधीक स्वरुपाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाचा पाठपुरावा सुरू असून शासनाकडून लवकरच मान्यता मिळणार आहे. पांगोली नदीच्या उगम ते संगमापर्यंत एकुण ५९ बंधा-यांचे बांधकाम झाल्याचे जिल्हा जलसंधारण अधिकारी अनंत जगताप यांनी सांगितले.

पांगोली नदीचे उगम तेढा ता. गोरेगाव येथे झालेला असुन छिपीया गावा नजीक बाघ नदीला संगम होतो. या नदीवर मृद व जलसंधारण विभाग, गोंदिया मार्फत तुमखेडा, चुलोद, टेमणी, को.प.बं. खातीया, को.प.बं. कामठा व को.प.बं. पांजरा (गिरोला) असे एकुण ६ कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे या विभागातर्फे तयार करण्यात आले असुन लंबाटोला, गिरोला, पांजरा, कामठा, नवरगाव कला, नवरगाव (बु.), खातिया, बरबसपुरा, टेमणी, बटाणा, आंभोरा व परिसरातील शेतकरी या बंधाऱ्यापासुन सिंचनाकरिता नियमित पाण्याचा वापर करीत असतात. खरीप व्यतीरिक्त रब्बी/उन्हाळी धान पिकाखालील क्षेत्र सुद्धा वाढ होण्यास मदत झालेली आहे. या प्रत्येक मोठया बंधा-यांची पाणी साठवण क्षमता ३.०० मी उंची पर्यत आहे व पुर्ण क्षमतेने भरल्यावर प्रत्येक को.प. बंधा-यांच्या पाण्याची थोप कमीत कमी ३.०० कि.मी. पर्यत असते.

पांगोली नदीवरील या विभागाव्दारे निमीत कोल्हापुरी पध्दतीच्या बंधा-यापासुन जवळपास ७८८ हेक्टर क्षेत्रात ओलीत होत असुन नदीपात्रात अडवलेल्या पाण्यापासुन परिसरात पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच जनावरांसाठी सुद्धा पाण्याचा वापर करण्यात येत असतो. तसेच शेतक-यांना सिंचनाकरिता पाण्याचा वापर करता येतो. याच नदीवर सन २०२०-२१ मध्ये ङ्गजुन्या निरुपयोगी पुलाचे बंधा-यांत रुपांतरङ्ग हे काम करण्यात आलेले होते. प्रचलित रचना व पारंपरिक पध्दतीने बांधकाम केल्यास या कामाचा अंदाजित खर्च रु.३.०० कोटी अपेक्षीत होता. सदर काम मृद व जलसंधारण विभागामार्फत (नविन्यपुर्ण) पध्दतीने फक्त रु.२१.०० लक्ष मध्ये पुर्ण केले होते व पुर्ण क्षमतेने भरल्यावर या पाण्याची थोप खमारी या गावापर्यंत होती. आज रोजी सुद्धा छोटा गोंदिया परिसरात या बंधा-या लगत जवळपास १.०० मी खोलीचे पाणी उपलब्ध आहे. छोटा गोंदिया तसेच चुलोद भागातील उन्हाळी पिकांचे क्षेत्र वाढले आहे.

नदी लगत छोटा गोंदिया (छत्रपती शिवाजी सरोवर /भीम घाट) परिसरास लागून असलेल्या भागाचे सौंदर्यीकरण करण्यासाठी नगर परिषद गोंदिया मार्फत रु.७२.०० लक्ष मंजुर करण्यात आले असुन काम लवकरच सुरु होणार आहे. पांगोली नदी उगम स्थळापासुन ५० ते ५५ कि.मी. लांब असुन नदीचे पात्रात गाळ साचल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात नदीत वाहते प्रवाह दिसत नाही. त्याकरिता नदीचे पात्रातुन गाळ काढणे व खोलीकरणाचे काम हाती घेण्यात आल्यास नदीत आवश्यक तेवढा पाणी प्रवाह राहील. पांगोली नदीपात्रातुन साचलेला गाळ काढुन खोलीकरण/रुंदीकरण केल्यास नदीकाठावरील गावातील पाणी टंचाई दूर होऊन पर्यायाने शेतकऱ्यांना बारमाही सिंचनासाठी पाणी साठा उपलब्ध होईल व परिसरातील गावांना पुराचा धोका कमी होईल. याकरिता एक प्रातिनिधीक स्वरुपाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

पांगोली नदी खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामास गती दिली गेल्यास इतर देखील फायदे आहेत. (१) नदीत पाणी साठा उपलब्ध असल्यास स्थानिक मच्छीमारांना सुध्दा उपयोगी येऊ शकतो. (२) नदी पात्रात पाणी साठा उपलब्ध असल्यास परिसरातील परंपरागत विटभट्टी कामगारास विट भटया व्यवसायासाठी सुध्दा पाण्याचा वापर होऊ शकतो. हे सर्व प्रयत्न यशस्वी झाल्यास पाणी साठवण क्षमतेत वाढ होईलच व त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दुबार पिकाकरिता ओलीताची सोय पर्यायाने उन्हाळ्याच्या दिवसात पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होईल. पांगोली नदीद्वारे गावातील भूगर्भातील पाणी पातळी वाढुन जनतेला व शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होऊ शकते. पुर्व विदर्भातील महाराष्ट्राच्या सिमेवर असलेल्या गोंदिया जिल्हयातील गोरेगाव, आमगाव व गोंदिया तालुका "सुजलाम सुफलाम" होऊ शकतो. पांगोली नदीच्या उगम व संगमापर्यंत एकुण ५९ बंधा-यांचे बांधकाम झालेले आहे. या नदीच्या लगत असलेल्या सर्व ग्रामपंचायतींना नदी काठावर शक्य असल्यास वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेणे बाबत कळविण्यात आलेले आहे. या प्रमाणे उगम ते संगमापर्यंत सर्व प्रकारचे नियोजन करण्यात येत असुन येणा-या काळात पांगोली नदी एक वेगळी ओळख निर्माण करेल यात शंका नाही असेही अनंत जगताप यांनी सांगितले.

# तेंदू लिलावातून वनविभागाल ११.९१ कोटीची रॉयल्टी मिळणार



**गोंदिया:** जिल्हा वनसंपत्तीने परिपूर्ण आहे. ज्यामध्ये सर्वाधिक तेंदूपत्ताचे उत्पादन होते.ते २०२२-२३ या आर्थिक वर्षातील तेंदूपत्ता हंगामात वन विभागाच्या २८ तेंदूपत्ता युनियटपैकी २७ युनिटचे ई-लिलाव करण्यात आले असून या लिलावातून ११ कोटी ९१ लाख ३३ हजार ९८२ रुपये रॉयल्टी म्हणून वनविभागाच्या तिजोरीत जमा होणार आहे. दरम्यान या रॉयल्टीपैकी आतापर्यत ६० टक्के रक्कम वनविभागाच्या तिजोरीत जमा झाली आहे.

विदर्भात सर्वाधिक जंगल परिसर असलेला जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. वनाच्या बाबतीत गडचिरोली जिल्ह्यानंतर गोंदिया जिल्ह्याचा क्रमांक लागतो. जिल्ह्यात वन विभागाचे ५६ वर्तुळर्तु आहेत. त्यात २७४ बीट तयार करण्यात आले आहे.

ज्यामध्ये गोंदिया, गोरेगाव, सडक अर्जुनी, आमगाव, तिरोडा, अर्जुनी मोर, सालेकसा, दक्षिण देवरी व उत्तर देवरीसह गोठणगाव,नवेगावबांध, चिचगड असे १२ रेंज आहेत. तर २ लाख ५४ हजार २८८ हेक्टर क्षेत्रफळ वन क्षेत्रात असून पैकी १ लाख ७३ हजार हेक्टर क्षेत्रफळ वनविभागाच्या अख्त्यारीत येतो. जिल्ह्यात वनविभागातंर्गत २८ तेंदूपत्ता युनिट आहेत. त्यापैकी पै २८ युनियु टचा ई-निविदाद्वारे लिलाव करण्यात आला आहे. या लिलाव प्रक्रियेतूनतू गोंदिया वनविभागाला ११ कोटी ९१ लाख ३३ हजार ९८२ रुपयांची रॉयल्टी प्राप्त झाली आहे. त्यापैकी ६० टक्के रक्कम वनविभागाकडे जमा झाली आहे. तर उर्वरित ४० टक्के रक्कम तेंदूपत्ता संकलन हस्तांतरित करण्यापूर्वी प्राप्त होणार आहे. तेव्हा तेंदूपानाच्या लिलावातून वनविभागाची तिजोरी आता भरणार आहे.

सन २०२० मध्ये तेंदूपानाचे केवळ १५ युनिटचे लिलाव करता आले होते.त्यामुळे फक्त ३ कोटी ९९ लाख ७१ हजार रुपयांची रॉयल्टी प्राप्त झाली होती. परिणामी तेंदूपत्ता गोळा करणाऱ्या मजुरांना अद्यापही बोनस देण्यात आलेला नाही. मात्र यंदाच्या हंगामात वन विभागाला तेंदूपत्ता लिलावातून कोट्यावधी रुपयांची रॉयल्टी मिळाल्याने तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या कामगारांना बोनस मिळण्याची आशा वाढली आहे.

## तोतया आमी अधिकाऱ्याने डॉक्टरांना एक लाखाने गंडविले

**गोंदिया :** शहराच्या न्यू लक्ष्मी नगरातील डॉ. सुनील बाळकृष्ण देशमुख (३७) यांना रक्त तपासणीच्या नावावर आमी अधिकारी असल्याचे सांगून तब्बल एक लाखाने लुटले. ही घटना ९ मे रोजी दुपारी ३.३० ते ५ वाजता दरम्यान घडली.शास्त्री वॉर्ड गोंदिया येथे वैद्यकीय व्यवसाय करणारे डॉ. सुनील बाळकृष्ण देशमुख (३७) यांना सतीशकुमार नावाच्या व्यक्तीने फोन केला. मी आमीतून बोलतो, आमच्या ५० जवानांची रक्त तपासणी करायची आहे. त्यांच्यासाठी किती खर्च येणार असे डॉक्टरांना विचारले.डॉक्टराने प्रति व्यक्ती २ हजार असे सांगितल्यावर आरोपीने थोड्या वेळात क्रेडिट कार्डने मी आपल्याला पैसे पाठवितो.आमच्या ऑफिसर सोबत व्हॉट्स?पवर बोला, असे सांगण्यात आले.

व्हिडिओ कॉलवर फोन करून त्यांना दुसऱ्या मोबाईलने प्रोसेस करायला सांगितले. त्यात त्यांच्या पत्नीच्या खात्यातील ५० हजार एका वेळी व दुसऱ्या वेळी सुद्धा ५० हजार असे एक लाख रुपये आपल्या खात्यात वळते करवून घेतले.

# अखेर घड्याळी तासिका शिक्षकांना मिळणार थकीत मानधन

## जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांचा पुढाकार



**गोंदिया:-** मागील दोन वर्षांपासून थकीत असलेले मानधन मिळावे यासाठी तासिका तत्त्वावर असलेल्या शिक्षकांनी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्या मागणीवर जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी तात्काळ प्रभावाने कार्यवाही केल्याने अखेर लवकरच या तासिका तत्त्वावरील शिक्षकां च्या मानधनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत तासिका तत्त्वावर विद्यादानाचे काम काही शिक्षक करीत आहेत. मात्र सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षातील त्यांचे मानधन थकले होते. आधीच अल्प मानधनात विद्यादानाचे काम करीत असताना या शिक्षकांना आर्थिक त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे आज १८ मे रोजी तासिका तत्त्वावरील शिक्षकांनी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांची भेट घेऊन समस्या मार्गी लावण्यासाठी निवेदन दिले.

या निवेदनावर जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी तात्काळ कार्यवाही सुरू करुन शिक्षणाधिकारी यांना त्वरित यावर तोडगा काढण्याचे निर्देश दिले. अखेर जिल्हा परिषदेच्या निधीतून या तासिका तत्त्वावरील शिक्षकांना मानधन देण्याची कार्यवाही सुरू झाली असून येत्या १५ दिवसांत अंदाजे १८ लाख रुपये जिल्हा निधीतून या तासिका तत्त्वावर असलेल्या शिक्षकांना मानधन मिळणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांचे तासिका तत्त्वावरील शिक्षकांनी आभार मानले आहेत.

# समर्पित आयोगाच्या भेटीसाठी आता जिल्हाधिकारी कार्यालयातच नोंदविता येणार नाव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ मे २०२२ | बुधवार | कोकण | दु. २.३० ते ४.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन |
| २८ मे २०२२ | शनिवार | अमरावती | स. ९.३० ते ११.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती |
| २८ मे २०२२ | शनिवार | नागपूर | सायं. ४.३० ते ६.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |

**गोंदिया :** महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती आणि शहरातील महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (ओबीसी, व्हीजे एनटी) आरक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित मागासवर्ग आयोग गठीत केला आहे.या आयोगाचा दौरा २१ मे पासून पुणे येथून सुरु झालेला आहे.

दरम्यान आयोगाच्यावतीने आयुक्त कार्यालयात नाव नोंदणी भेटीपुर्वी करावे अशा सुचना देण्यात आल्या होत्या.त्यावर ओबीसी अधिकार मंचच्यावतीने खेमेंद्र कटरे यांनी आक्षेप नोंदवत जिल्हास्तरावरील व्यक्ती आयुक्त कार्यालयात नाव नोंदणीला कसे जाणार हा मुद्दा प्रसारमाध्यमातून उपस्थित केलेला होता. त्याची दखल घेत नागपूर विभागीय आयुक्तांनी १७ मे रोजी विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना पत्रपाठवून आयुक्त कार्यालयासह जिल्हाधिकारी कार्यालयात सुध्दा जिल्हा पातळीवर नाव नोंदणी करण्याचे निर्देश दिले होते.

**ओबीसी अधिकार मंचच्या प्रयत्नांना यश, ओबीसी बांधवानी मोठ्या संख्येने व्हावे आयोगासमोर हजर**

त्यानुसार आता नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात ओबीसी नागरिक,संघटना व संस्थाना आयोगाला भेटण्याकरीता नाव नोंदणी करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी या समर्पित आयोगाने विभागवार कार्यक्रम जाहीर केला आहे.

त्यानुसार शनिवार दिनांक २८ मे २०२२ रोजी सायंकाळी ४.३० ते ६.३० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे समर्पित मागासवर्ग आयोगाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या समर्पित आयोगाच्या भेटीच्या वेळी नागरिकांना आपली मते वेळेत मांडता यावीत आणि निवेदन देता यावे यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर,सर्व जिल्हाधिकारी कार्यालय तसेच गोंदिया येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल शाखेचे श्री केंद्रे या कर्मचाऱ्याकडे आपल्या नावाची नोंदणी भेटीच्या दिनांकापूर्वी २७ मे २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत करावे, असे आयोग व विभागीय आयुक्तातर्फे निवेदन करण्यात आले आहे.

### विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

समर्पित आयोग विभागीय आयुक्त कार्यालयात निवेदने स्वीकारणार असल्यामुळे व्यवस्थेसंदर्भात विभागीय आयुक्त डॉ.माधवी खोडे-चवरे यांनी आढावा घेतला.आयोगासमोर निवेदने देण्यासाठी आपली मते वेळेत मांडता यावीत यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने यादृष्टीने संपूर्ण व्यवस्था करावी, अशा सूचना विभागीय आयुक्त यांनी केल्या.

# जिल्हा परिषदेच्या पाच विभागाच्या योजना ग्रामीण विकास यंत्रणेला जोडल्या



**गोंदिया:-** जिल्हा परिषदेकडील पाच योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला जोडण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. राज्यातील ग्रामीण भागातील केंद्र आणि राज्य पुरस्कृत योजनांची जिल्हा स्तरावर एकाच यंत्रणेकडून प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.हे केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या विविध योजना राबवण्यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये २ फेब्रुवारी १९८२ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला.

या यंत्रणेकडील कर्मचाऱ्यांचे वेतन व प्रशासकीय खर्चासाठी केंद्रशासना कडून ६० टक्के व ४० टक्के राज्याकडून हिस्सा दिला जात होता. परंतु केंद्र शासनाने मार्च २०२२ नंतर हा निधी थांबवण्याचा निर्णय घेतला. परंतु महाराष्ट्र शासनाने ६० टक्क्यांच्या हि श्श्याची जबाबदारी उचलत हा विभाग बळकट करण्याचे ठरवले.त्यानुसार या विभागाकडील कार्यभार वाढवण्यात आला आहे. त्यांच्याकडील नियमित कामकाजा बरोबरच जिल्हा परिषदेच्या पाच विभागांकडील योजना या विभागाकडे जोडण्यात आल्या आहेत. या योजनांची कार्यवाही करताना थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यां ऐवजी आता ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकां मार्फत जावे लागणार आहे. हे अधिक प्रभावी पणे योजना राबवण्यासाठी हा बदल उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे.

# भाजपा ओबीसी मोर्च्याचे धरणे आंदोलन

**गोंदिया:-** महाराष्ट्रातील आघाडी सरकारच्या मनातच ओबीसींना आरक्षण द्यायचे नव्हते हे पुन्हा एकदा उघड झाले. राज्य सरकारच्या वेळ काढू धोरणामुळेच महाराष्ट्रातील ओबीसींचे राजकीय आरक्षण गेले. आरक्षासंदर्भात कधीच गंभीर नसलेल्या सरकारने मा सर्वोच्च न्यायालयात योग्य बाजू मांडली नाही आणि इंपिरिकल डेटा करीता केंद्र सरकारकडे बोट दाखवीत बसले. त्याउलट मध्यप्रदेश मधील भाजपा सरकारने योग्य तो इंपिरिकल डेटा गोळा करीत ओबीसींचे आरक्षण पदरी पडून घेतले. परंतु महाराष्ट्रातील लबाड सरकार आरक्षणाच्या मुद्द्यावर तोंडघशी पडले आरक्षणाच्या मुद्यावर सरकार मधील काही नेते ढोंगीपणा करीत आहेत त्यांनी पदाचा व मंत्रिपदाचा राजीनामा द्यावे याकरीता भाजपा ओबीसी मोर्च्याच्या वतीने जिल्हाधिकाकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन तथा लाक्षणिक उपोषण करण्यात आले.त्यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना ओबीसी आरक्षणासंदर्भातील मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. एकदिवसीय धरणे आंदोलन तथा लाक्षणिक उपोषणात प्रामुख्याने केशवराव मानकर, गजेंद्र फुडें, जि.प.अध्यक्ष पंकज रहागंडाले, संजय टेंभरे, सुनिल केलनका, गुड्डु कटरे, डॉ.साहेबलाल कटरे,धनजंय रिनायत, संजय कटरे, विलास चव्हाण, डॉ.लक्ष्मण भगत,नेतराम कटरे, राजेश चतुर, सुभानराव रहागंडाले, शेषराव गिरेपुंजे, दिपक कदम,नंदु बिसेन,रमेश कुथे, सुनिता तरोणे आदी उपस्थित होते.



# नवउद्योजकांना मार्गदर्शन करण्यासाठी उद्यमिता यात्रेचे आयोजन

गोंदिया : उद्योजकता, सूक्ष्म व्यवसाय, कौशल्य विकास व तरुणांच्या प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी राज्यव्यापी उद्यमिता यात्रेचे आयोजन महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि युथएड फ ाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. उद्यमिता यात्रा १० मे पासून मुंबई येथून सुरू झाली आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून जनजागृती करत ही यात्रा २६ मे २०२२ रोजी गोंदिया येथे दाखल होणार आहे.राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ४० दिवस, सुमारे चार हजार किलोमीटरचा प्रवास या यात्रेद्वारे करण्यात येणार आहे.

यात्रेमध्ये ४० उद्योजकता प्रशिक्षक सहभागी होणार असून हे प्रशिक्षक सुमारे ४० हजाराहून अधिक युवकांना भेटतील, त्यांना सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण देतील. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालयांमध्ये उद्योजकतेबद्दल जागरुकता निर्माण करण्यात येणार आहे. ज्यांच्याकडे उद्योगाच्या नवनवीन संकल्पना आहेत अशा युवकांशी संवाद साधण्यात येणार आहे. युवकांमध्ये उद्योजकीय मानसिकता निम ाण करण्यासाठी विविध उपक्रम यात्रेदरम्यान राबविण्यात येतील. प्रत्येक जिल्ह्यात तीन दिवसांच्या उद्योजकता प्रशिक्षणाचा कार्यक्रमही राबविण्यात येणार आहे.

युवकांचा कौशल्य विकास, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी, नवनवीन संकल्पनांना प्रोत्साहन देणा?या स्टार्ट अपचा विकास या म ाध्यमातून राज्याच्या शाश्वत विकासाला चालना मिळणार आहे. या यात्रेचा लाभ युवकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात शुन्य कोरोना बाधित

**गोंदिया:** शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही. तर डिस्चार्ज रुग्णांची संख्या शुन्य आहे. आजपर्यंत ४६,२१६ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले.४५,४९४ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली.

# ओबीसी मंत्र्यांनो आता तरी लाचारी सोडा,समाजासाठी हिंमत दाखवा-खा.मेंढे




**गोंदिया :** महाविकास आघाडी सरकारच्या बेफिकीरीमुळे ओबीसी राजकीय आरक्षण राज्यात गमावले व ते पुन्हा मिळत नाही. सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी लाचारी सोडावी आणि ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिंमत दाखवावी, असे आव्हान खासदार सुनील मेंढे यांनी आज १९ मार्च रोजी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिले.

यावेळी प्रामुख्याने भाजपा जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर, आ. विजय रहांगडाले, जि प अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी आ. भेरसिंह नागपुरे, माजी आ. रमेशभाऊ कुथे, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, भंडारा गोंदिया संपर्क प्रमुख वीरेंद्र अंजनकर, जिल्हा महामंत्री संजय कुलकर्णी, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भावना कदम, ओबीसी आघाडी जिल्हाध्यक्ष गजेंद्र फुंडे, किसान आघाडी जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, सहकारआघाडी जिल्हाध्यक्ष दीपक कदम, जिल्हा उपाध्यक्ष नंदकुमार बिसेन, माजी नगरसेवक बंटी पंचबुद्धे, शालिनी डोंगरे आदी उपस्थित होते.

खा. मेंढे म्हणाले की, ओबीसींना राजकीय आरक्षण देताना ते किती प्रमाणात द्यावे हा प्रश्न आहे व त्यासाठी समर्पित आयोगामार्फत एंपिरिकल डेटा अर्थात ओबीसींची वस्तुस्थितीनुसार आकडेवारी गोळा करून प्रमाण ठरवणे आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्रातील ओबीसी राजकीय आरक्षण स्थगित करतानाच ते पुन्हा लागू करण्यासाठी ही तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले होते.

महाविकास आघाडी सरकारने नेमके हेच काम केले नसल्याने राज्यातील ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा लागू होत नाही. दुसरीकडे मध्य प्रदेशने न्यायालयाच्या आदेशानंतर ताबडतोब डेटा गोळा करून चाचणी पूर्ण केली व ओबीसी आरक्षण पुन्हा मिळवले. मध्य प्रदेशमधील भाजपा सरकारच्या यशानंतर महाविकास आघाडी सरकारचे अपयश पुन्हा स्पष्ट झाले आहे. या सरकारमधील ओबीसी मंर्त्यांनी आता तरी सत्तेची लाचारी सोडावी आणि सरकारवर दबाव आणण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिंमत दाखवावी.

ते म्हणाले की, एंपिरिकल डेटा गोळा करून तिहेरी चाचणी पूर्ण केली की ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या ४ मार्च २०२१ निकालापासूनच स्पष्ट होते. परंतु आता मध्य प्रदेशचा निकाल आल्यावर नवा शोध लागल्यासारखे या सरकारचे मंत्री महाराष्ट्रालाही आपोआप आरक्षण मिळेल अशी दिशाभूल करत आहेत. महाविकास आघाडीने एंपिरिकल डेटा गोळा करण्यात अक्षम्य टाळाटाळ केल्यामुळेच ओबीसींना परत आरक्षण मिळत नाही. या अपयशाची जबाबदारी सरकारमधील ओबीसी मंत्र्यांचीही आहे. त्यामुळेच त्यांनी आता तरी समाजासाठी हिंमत दाखवावी व मध्य प्रदेशप्रमाणे महाराष्ट्राने तिहेरी चाचणी पूर्ण करून आरक्षण परत मिळविण्यासाठी मंत्रिपदाचे राजीमाने देऊन सरकारवर दबाव आणावा.

# ज्ञानाची भूक नसणारा शेतकरी अज्ञानी : आ.मनोहर चंद्रिकापुरे




**अर्जुनी-मोरगाव :** पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकरी राबराब राबतो. मात्र उत्पन्न आणि खर्चाचे गणित करीत नाही. शेतकऱ्याला व्यापारी होता आले नाही. स्वातंत्र्या नंतरच्या काळात सरकारने याकडे दुर्लक्ष केले. व्यापारी मोठे झाले, शेतकरी आहे तिथेच आहे. जो जोखीम पत्करतो तो नफा कमावतो. यावषी टरबूज पीक घेणारे श्रीमंत झाले. आम्हाला धानाच्या मानसिकत्तेतून बाहेर पडून पीकबदल करित नफ्याच्या शेतीकडे वळावे लागेल. जो शेतकरी अफाट कष्ट करतो तो शेतक?यांच्या हिताच्या फायदेशीर मार्गदर्शन मेळाव्यात तासभर बसू शकत नाही, ही शोकांतिका आहे. शेतकरी मेळावा यातून शेतकरी हिताचे ज्ञान मिळते. ज्ञानाची भूक नसणारा शेतकरी अज्ञानी होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. शेतकऱ्यांनी कृषी मार्गदर्शन शिबिरांमध्ये उपस्थित राहण्याचे आवाहन आ.मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.

ते स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डमध्ये शेतकरी मेळावा आणि उत्कृष्ट शेतकऱ्यांच्या सत्कार समारंभाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.सेंट्रल बँकेचे माजी संचालक प्रमोद लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विभागीय कृषी सहसंचालक रवींद्र भोसले, कृषी तज्ञ डॉ.सी.आर. श्यामकुवर, रंगनाथ कटरे, उपविभागीय कृषी अधिकारी मंगेश वावधरे, उपविभागीय अधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी, शास्त्रज्ञ अनिल पाटील, नागपूर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य देवानंद पंचभाई, नगराध्यक्षा मंजूषा बारसागडे, उपसभापती सविता कोडापे, उपसभापती होमराज पुस्तोडे, ताकृअ रवींद्र लांजेवार, नगर सेविका शीला उईके, कृउबास प्रशासक गिरीश पालीवाल, बंसिधर लंजे, बीडीओ निमजे उपस्थित होते.

चंद्रिकापुरे म्हणाले, माझ्या भागातील शेतकरी संपन्न होण्यासाठी या भागात उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची गरज आहे. प्रत्येक शेतकरी हा ग्राहक झाला पाहिजे, असे प्रतिपादन केले.मेळाव्याला डॉ.श्याम कुवर यांनी धान पिकावर, डॉ.रवींद्र भोसले यांनी पीक बदलावर मार्गदर्शन केले. या भागातील मोहा पिकावर आधारित वायनरी प्रोजेक्ट उभारण्याची माहिती दिली. कटरे यांनी राष्ट्रीय कृषी बाजारपेठ योजनेबद्दल माहिती दिली. प्रत्येकाने इनाम अंतर्गत नोंदणी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी तालुक्यातील उत्कृष्ट शेतकऱ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासक लोकपाल गहाणे यांनी मांडले. संचालन प्रशासक उद्धव मेहेंदळे यांनी केले. आभार सचिव संजय सिंगनजुडे यांनी मानले.